**संदर्भः-** मा. अध्यक्ष, निवड समिती, राष्ट्रिय आरोग्य अभियान तथा आयुक्त नाशिक महानगरपालिका नाशिक यांची दि. १३/१२/२०२५ रोजीची मंजुर टिपणी

---

जा.क्र./सा.आ.वि./एनयूएचएम/डेस्क-२/ ७३५/२०२५,
दि.- १३/ १२/२०२५

राष्ट्रिय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत नाशिक महानगरपालिका स्तरावरील कंत्राटी X-RAY TECHNICIAN **पदाकरीता** आपली नियुक्ती करण्यात येत आहे. नियुक्ति कालावधी हा पदस्थापनेच्या ठिकाणी हजर झाल्यापासुन ते २९/०६/२०२६ पावेतो तात्पुरत्या स्वरुपाची आहे. सदर पदावकरीता एकत्रित मासिक वेतन हे र.रुपये १७०००/- (अक्षरी: सतरा हजार रुपये मात्र) देय राहिल. वैदयकिय आरोग्य अधिकारी, नाशिक महानगरपालिका नाशिक यांचे कार्यालयात रुजुपत्र,करारनामा सादर करणे अनिवार्य आहे.

| SR.NO. | CANDIDATE NAME ( SURNAME MIDDLE NAME & FIRST NAME ) | SELECTION CATEGORY | WORKING PLACE- NAME OF UCHC |
|---|---|---|---|
| 1 | PATIL RAMKRUSHNA NANU | OPEN | SATPUR |

आदेश मिळालेपासुन ७ दिवसांचे आत (सुटटीचे दिवस वगळुन) पदस्थापनेच्या ठिकाणी हजर व्हावे. अन्यथा आपणास सदर नियुक्तीस इच्छुक नाही असे समजुन नियुक्ती रदद समजण्यात येईल. व पुढील उमेदवारास नियुक्ती आदेश देणेत येतील. सदर बाबत आपणास उलट टपाली कळविले जाणार नाही.

कामावर रुजु होताना नियुक्ति आदेशातील अटि व शर्ती मान्य असलेबाबत रुपये १००/- च्या स्टॅप पेपरवर करारनामा वैदयकिय आरोग्य अधिकारी यांना सादर करावा. सदर करारनामा सादर न केल्यास आपले मानधन अदा केले जाणार नाही.

**अटी व शर्ती**

१) कंत्राटी कर्मचारी यांनी कामावर रुजु होताना विहीत नमुन्यात र.रु.१००/- स्टॅप पेपरवर प्रतिज्ञापत्र/करारनामा सादर करणे बंधनकारक आहे. सदर करारनामा सादर न केल्यास आपले मानधन अदा केले जाणार नाही. सदयस्थितीत आपणावर कुठल्याही प्रकारचा गुन्हा दाखल नाही. याबाबत प्रतिज्ञापत्रात नमुद करावे.तसेच भविष्यात गुन्हा नोंद झाल्यास अथवा मागील गुन्हा आढळल्यास नियुक्ती संपुष्टात येईल.

२) सदर सेवा अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने आपण पदस्थापनेच्या ठिकाणी हजर झालेल्या दिनांकापासुन ते २९/०६/२०२६ या कालावधीकरीता राहिल.तदनंतर सदर नियुक्ति आपोआप संपुष्टात येईल. त्याकरीता वेगळा आदेश देण्यात येणार नाही किंवा वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही. सदर पदाकरीता अटीशर्तिंच्या अधीन राहुन पुनर्नियुक्तीकरीता स्वतंत्रपणे अर्ज करावा लागेल.

३) सदर करारसेवेसाठी दरमहा एकुण रुपये इतका एकत्रित र.रुपये १७०००/- (अक्षरी: सतरा हजार रुपये मात्र)मोबदला दिला जाईल अन्य कोणताही भत्ता दिला जाणार नाही. तसेच मनपावर कुठल्याही प्रकारे दायित्व राहणार नाही.

४) हा प्रकल्प काही कारणाने बंद पडला अथवा कार्यक्रम कृती आराखडयात नियुक्ति दिलेल्या पदास मंजुरी न मिळाल्यास आपली सेवा आपोआप संपुष्टात येईल.

५) मा. सहसंचालक (अतांत्रिक) राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे परिपत्रक क्र. ६५५२३-७८४/ दि. ०९/०९/२०२४ अन्वये राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान मानव संसाधन मनुष्यधोरण (HR POLICY) अन्वये रजा अनुज्ञेय राहतील. इतर कोणतीही रजा देय नाही. तसेच कोणत्याही प्रकारच्या रजा वेतन अनुज्ञेय राहणार नाही.

६) आपण आपले कर्तव्य दरमहिन्याच्या व वर्षाच्या इष्टांकानुसार पुर्ण करणे अपेक्षित आहे. आपणास नियुक्त केलेल्या शहरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे Key performance indicators, SLA,Outcomes & indicator wise target प्रमाणे कामकाज करणे आपणाकडुन अपेक्षित आहे. वार्षिक उददीष्टांमध्ये लक्षणीय सुधारणा करणे अपेक्षित आहे.तसेच आपल्या प्रत्येक महिन्याचा तपशिल अहवाल सार्वजनिक आरोग्य विभाग,मुख्य कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

७) संबंधितांनी दिलेल्या ठिकाणी राष्ट्रिय शहरी आरोग्य अभियान तसेच आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे सुचनेनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील.

८) संबंधित शासन मान्य कौंन्सिलचे रजिस्ट्रेशन नुतनीकरण करणे बंधनकारक राहील. (लागू असल्यास)

९) मार्गदर्शक सुचनेनुसार आपणास दर दिवशी कार्यालयीन कामकाजाच्या ठिकाणी हजेरी पत्रकावर स्वाक्षरी तसेच बायोमेट्रीक (सेल्फि) करणे बंधनकारक आहे. अन्यथा आपले मानधन अदा केले जाणार नाही.

१०) वार्षिक उददीष्टांप्रमाणे कार्यमुल्यांकन अहवालानुसार (Performance Report) कामकाज पुर्ण करणे आवश्यक राहील.कामकाज असमाधानकारक असल्यास नियुक्ति संपुष्टात आणण्यात येतील.

११) जर करारसेवा राजीनामा दयावयाचा असेल तेव्हा वैदयकिय आरोग्य अधिकारी, नाशिक महानगरपालिका नाशिक यांचेकडे एक महिना अगोदर नोटीस दयावे लागेल अन्यथा एक महिन्याचा मोबदला भरावा लागेल.

१२) या सेवा करार पध्दतीच्या असल्याने कायम स्वरुपी नियुक्तीचा अधिकार राहणार नाही.तसेच मनपा येथे नोकरीत कुठलाही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही.

१३) शासन सेवा शर्ती खाली ही सेवा येत नसल्याने त्या अनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन, विमा योजना, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र राहणार नाही.

१४) करार सेवा कार्यभार सांभाळताना शासन अथवा खाजगी मालमत्तेचे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या जे नुकसान होईल त्यांची संपर्ण जबाबदारी करार सेवकावर राहिल. सदर नुकसानीची भरपाई न केल्यास वसुली जमील महसुल वसुली पध्दतीने करण्यात येईल.

१५) नाशिक महानगरपालिकेतर्फे रोगनिदान शिबिर, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिर इ. आयोजीत केली असता सदर शिबिराच्या ठिकाणी हजर राहून रुग्णांना सेवा देणे बंधनकारक राहील.

१६) ज्या कंत्राटी कर्मचारी यांची कर्तव्यात अनियमितता आढळुन येईल अथवा रुग्णांकडे दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची नोंद घेऊन व सदर बाब त्यांच्या निदर्शनास आणुन त्याबाबत नियमानुसार दखल घेऊन कार्यवाही करण्यात येईल.

१७) कंत्राटी कर्मचारी यांना आपत्कालीन परीस्थितीत अथवा आवश्यक असल्यास मनपाच्या इतर रुग्णालयात/शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रात सुध्दा सेवा पुरवावी लागेल.

१८) शासन/महापालिका नियमानुसार कामकाज करणे बंधनकारक राहील. तसेच वैदयकिय अधिक्षक/वैदयकिय अधिकारी अथवा वैदयकिय (आरोग्य) अधिकारी यांचे सुचनेनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील.

१९) नियुक्ति झालेनंतर संबधित कंत्राटी कर्मचारी यांनी रुजु अहवालाची व नियुक्तिची एक प्रत तसेच प्रत्येकी ३ प्रतिंमध्ये आधारकार्ड,पॅनकार्ड, बॅकेच्या पासबुकची पहिल्या पानाची छायांकित प्रत व एक कॅन्सल चेक व्यक्तिशः आपल्या रुग्णालयातील/श.प्रा.आ.केंद्रातील संबधित डी.ई.ओ.कम अकौटट यांना मानधन अदा करणेकामी माहिती दयावी.

२०) अ)केंद्रशासनाने संबधित पदे नामंजुर केल्यास त्यांची सेवा कोणतीही पुर्व सुचना न देता तात्काळ सेवा समाप्त करण्यात येतील.

ब) योजनानिहाय आढावा घेऊन आवश्यकतेनुसार कर्मचारी यांना एका ठिकाणाहुन दुसया ठिकाणी स्थलांतरीत करण्यात येईल.

२१) नियुक्ती आदेशातील अटिशर्तिमध्ये वेळोवेळी बदल करणे अथवा नियुक्ति संपुष्टात आणणे याबाबत सर्व अधिकार मा. आयुक्त सो. यांनी राखुन ठेवले आहेत.

- मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेने

sd/-

वैदयकिय आरोग्य अधिकारी
नाशिक महानगरपालिका नाशिक

प्रत माहितीस्तव सविनय सादर –

१) मा आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, रा. आ. अ., मुंबई.

२)मा आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक.

प्रत कार्यावाहीस्तव

१.विभागीय वैदयकिय अधिकारी - संबधित

२. वैदयकिय अधिकारी-शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र- संबधित

३.डाटा एन्ट्री ऑपरेटर कम अकौंटट- संबधित